भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र.२९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०४/२०१७

१) हयगयीने धुऱ्याच्या कचऱ्याला आग लावुन ती आग उसाचे पिकाला लागुन उसाचे पिक जळुन नुकसान झालयाने गुन्हा नोंद:—

दिनांक १६/०४/०१७ चे १२.०० वा. दर. यातील आरोपीने त्याचे शेतातील धुऱ्याचे कचऱ्याला आग लावली ती आग फिर्यादीचे शेतातील उसाचे पिकाला लागुन उसाचे पिक जळुन ४०,०००/—रू.नुकसानी झाल्याने व आरोपीने आगीबाबत कोणतीही काळजी न घेता हयगई केल्याने फिर्यादी युवराज वासुदेव बोरकर वय ४२ वर्ष रा. रेंगेपार यांचे लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखनी येथे कलम २८५,४२७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

२) टाटा इंडीका कार चालकाच्या निष्काळजीपनामुळे ऊभ्या असलेल्या दोन्ही वाहनांचे मागे धडक मारून ऑटो मधिल दोन प्रवाशांना जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २४/०४/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले ऑटो क्र. एमएच ३६ एच ३९१७ मध्ये प्रवाशी बसवुन बेला गावाचे बसस्टॉपवर उभा असतांना त्याचे ऑटो समोर बस क्र. एमएच. २०/ए क्यु. ६१०८ ही प्रवाशी घेत असतांना या दोन्ही वाहनाचे मागेहुन येणाऱ्या आरोपी टाटा इंडीका कारचे चालकाने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपने चालवुन उभे असलेल्या दोन्ही वाहनांचे मागे धडक मारून ऑटो मधिल बसलेल्या दोन प्रवाशांना जखमी करण्यास करणीभुत झाल्याने फिर्यादी रामेश्वर पुनाजी खोब्रागडे वय ४५ वर्ष रा. आनंद नगर शहापुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलमे १८४ मोवाका.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) ट्रक चालकाने ट्रक मध्ये हेले, म्हशी डांबुन,कोबुंन निर्दयतेची वागणुक देवुन चारा पाणी न देता,वैधकीय प्रमानपत्र सोबत न बाळगता कत्तली करिता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :— दिनांक २४/०४/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील ट्रक मध्ये ट्रक मालकाचे सांगण्यावरून ४हेले, १२म्हशीअसे एकुन १६ जनावरे किं. २,०००००/—रू. चे डांबुन कोंबुन त्यांना निर्दयतेची वागणुक देवुन जनावरांना चारापााणी न देता वैधकीय प्रमानपत्र सोबत न बाळगता जनावरे कत्तली करिता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी हेमंत विठ्ठल बांडेबुचे वय ५२ वर्ष रा. तकीया वार्ड भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१)(ड)(ई) प्रा. नि. वा. कायदा सहकलम ५ (अे) प्रा. सं. अधि. सहकलम ६६/१९२ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) लाचेची मागणी करून लाच स्विकारतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २४/०४/२०१७ चे १५.३८ वा. दरम्यान यातील आरोपी क्र. १ याने तक्रारदार श्री तकजिवन सिताराम हजारे वय ३३ वर्ष रा किरमटी यास त्याचे वडीलाचे शेतीवर महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणी विकास महामंडळ भंडारा यांचे कडुने १,०००००/–रू.कर्ज दुग्ध व्यवसायाकरिता मंजुर झाल्याने त्या कर्जाचा बोझा ७/१२वर चढविण्यासाठी ५००/रू. ची लाचेची मागणी करून सापडा कार्यवाही वेळी आरोपी क्र ०२ (खाजगी ईसम) चे मार्फतीने लाचेची रककम ५००/रू. स्विकारतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोनि. पारधी एसीबी. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ७,१२,१३(१)ड सहकलम १३ (२)ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. पारधी एसीबी. भंडारा पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) घरात स्लॅपचे लोखंडी कडीला नॉयलान दोरीने गळफास लावुन मृत्यु . :–

दिनांक २४/०४/२०१७ चे १३.००ते १४.०० वा दरम्यान यातील मृतक सौ. शितल गुलाब दिघोरे वय २८ वर्ष रा. परसोडी याचे लग्नालो ४ वर्ष झाले असुने ती स्वतः चे राहते घरी स्वयंपाक खोलीत कोणीही घरी हजर नसतांना स्लॅपचे लोखंडी कडीला नॉयलान दोरीने गळफास आत्महत्या केली तीचे मरणाचे कारण माहीत नाही. असे फिर्यादी रामदास किसनजी भोयर वय ४९ वर्ष रा. परसोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि.भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे

६) अवैध दारु अड्डयावर धाडी :–

दिनांक २४/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,मोहाडी,कारधा,तुमसर,गोबरवाही,साकोली,पालांदुर येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १६९ लिटर हा.भ. दारू + ६४० किलो सडवा मोहा साहीत्या किंमती ४१,९७०/–रु, ०३ लिटर ६०० मीलीलीटर देशी किंमती १०००/रू. असा एकुण किंमती ४२,९७०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २४/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ७६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६, तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(सपोनि. श्री. जि.एम. काळे )
पोलीस अधिक्षक कार्यालय
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९०२१२८२०३५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.